ePaper
| वर्ष - 6 | अंक - 170 | UDYAM-MH-26-0158827 |
महाईन्यूज™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com | रविवार | दिनांक 2 ऑक्टोबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# चांदणी चौकातील उड्डाणपूल अखेर स्फोटाने जमीनदोस्त



नवरात्रौत्सव
आजचा रंग
केशरी




## खासदार कोल्हेंनी भाजपा प्रवेशाची भाकीते फेटाळली

# राष्ट्रवादीचे खासदार अमोल कोल्हेंचा भाजपाशी "सुसंवाद"!

## नवी दिल्लीत घेतली केंद्रीय मंत्री अमित शहा यांची भेट

**| -पुणे |**
**| महाईन्यूज | प्रतिनिधी |**

केंद्रात सत्तेत असलेल्या प्रभावशाली नेत्यांची भेट घेतली पाहिजे. राज्याची संबंधित प्रश्न सोडवण्यासाठी राजकीय "सुसंवाद" ठेवला पाहिजे. छत्रपती शिवरायांचा जाज्वल्य इतिहास देशपातळीवर आणखी अधोरेखित व्हावा, "शिवप्रताप गरुड झेप" या चित्रपटाचे स्पेशल स्क्रीनिंग दिल्लीत घ्यावे, अशी इच्छा आहे. त्यासाठी अमित शहांनी वेळ द्यावी, या करिता नवी दिल्लीत त्यांची भेट घेतली, असा स्पष्ट दुजोरा



राष्ट्रवादीचे खासदार अमोल कोल्हे यांनी दिला आहे. त्यामुळे भाजपाशी असलेला 'सुसंवाद' खासदार कोल्हे यांचे राजकीय सिमोल्लंघन ठरतो की काय? अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

खासदार अमोल कोल्हे यांचा 'शिवप्रताप गरूड झेप' हा चित्रपट दसऱ्याच्या मुहूर्तावर प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्रातील बारकावे पुढच्या पिढीपर्यंत पोहोचावे, अशी अमोल कोल्हेंची भूमिका आहे. यासंदर्भात त्यांनी अमित शहांची भेट घेतली, असे सांगितले जात आहे.

अमोल कोल्हे म्हणाले की, हे वास्तव आहे की, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे सत्तेत असलेल्या प्रभावशाली नेत्यांपैकी एक आहेत. 'सीबीएसई'च्या पुस्तकांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास सविस्तर स्वरुपात नाही, अशी आपण खंत व्यक्त करतो. तसेच शिवनेरी किल्ल्यावर अजूनही महाराजांच्या स्वराज्याचा भगवा ध्वज नाही, अशीही भूमिका मी संसदेत मांडली होती. या खंत व्यक्त करतो, तेव्हा त्या पूर्ण होण्यासाठी प्रभावशाली नेत्यांचं

### अमोल कोल्हे भाजपाच्या वाटेवर...?

**मध्यंतरी, केंद्रीय आदीवासी राज्यमंत्री रेणुका सिंह यांनी शिरुर लोकसभा मतदार संघाचा प्रवास दौरा केला. त्यावेळी त्यांनी आगामी निवडणुकीत "शिरुरचा खासदार भाजपाचा असेल" असा दावा केला होता. त्यानंतर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासोबत खासदार कोल्हे यांची जवळीक वाढलेली दिसते. विविध विकास कामांच्या माध्यमातून कोल्हे भाजपाच्या दिग्गज नेत्यांच्या संपर्कात आहेत. यापूर्वी, 'व्हाय आय किल्ड गांधी' या चित्रपटात डॉ. कोल्हे यांनी नथुराम गोडसे यांचे पात्र साकारले होते. त्यामुळे कोल्हे यांची भाजपाशी जवळीक वाढल्याचे बोलले जात होते. दुसरीकडे, शिरुरमधून राष्ट्रवादीचे युवा नेते पार्थ पवार निवडणूक लढवतील. कारण, शिरुरमधील सहापैकी पाच विधानसभा मतदार संघात राष्ट्रवादीचे विद्यमान आमदार आहेत. त्यामुळे राजकीय दृष्ट्या हा मतदार संघ पार्थ यांच्यासाठी सुरक्षित आहे, असे बोलले जाते. दुसरीकडे, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील शिवसेनेच्या (शिंदे गट) माध्यमातून भाजपा- शिवसेना महायुतीच्या तिकीटावर दावा करणार आहेत. त्यामुळे संभाव्य राजकीय जोमीख लक्षात घेवून डॉ. अमोल कोल्हे राष्ट्रवादीतून भाजपात प्रवेश करतील आणि भाजपाच्या तिकीटावर आगामी निवडणूक लढवतील, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे. मात्र, सध्यातरी खासदार कोल्हे यांनी सर्व राजकीय शक्यता फेटाळून लावल्या आहेत.**

## चिखली-माशी-पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशनच्या मागणीला यश

# सोसायटीधारकांना दिलासा : ओला कचरा उचलण्यासाठी ३१ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ

## पर्यायी व्यवस्था करण्यासाठी महापालिका आरोग्य विभागाची तयारी

**| पिंपरी |**
**| महाईन्यूज | प्रतिनिधी |**

**पिंपरी-चिंचवड शहरातील मोठ्या हाउसिंग सोसायटींमधील ओला कचरा उचलण्यासाठी महापालिका प्रशासनाने 'नकार घंटा' केली होती. मात्र, सोसायटी फेडरेशन, स्वयंसेवी संस्था, संघटनांनी विरोध केला. अखेर महापालिका प्रशासनाने येत्या ३१ ऑक्टोबरपर्यंत ओला कचरा उचलण्याची तयारी दर्शवली आहे. त्यामुळे सोसायटीधारकांना दिलासा मिळाला आहे.**

शहरातील मोठ्या सोसायट्यांमध्ये दैनंदिन १०० किलो ओला कचरा निर्माण करत



होत्या. त्यांना घन कचरा व्यवस्थापन अधिनियमांतर्गत महापालिका प्रशासनाने त्यांचा कचरा वर्गीकरण करुन ओला कचरा सोसायट्यांमध्ये जीवरवण्यासाठी पत्रक काढले होते. दि. २ ऑक्टोबरपासून हा कचरा उचलण्यात येणार नाही, असा फतवा महापलिका प्रशासनाने काढला होता.

दरम्यान, चिखली-मोशी-पिंपरी-चिंचवड हाउसिंग सोसायटी फेडरेशनने आक्रमक भूमिका घेत ओला कचरा प्रशासनाने मनमानीपणे न उचलल्यास कचरा महापालिका आवारात फेकण्यात येईल, असा इशारा दिला होता. या इशाऱ्यानंतर भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांनी प्रशासन आणि सोसायटी फेडरेशनमध्ये सामोपचाराने तोडगा काढण्याची सूचना केली होती. त्यानुसार, पिंपरी-चिंचवड महापालिका आरोग्य विभागाचे उपायुक्त अजय चारठाणकर यांनी दि. २८ सप्टेंबर रोजी चिखली-मोशी-पिंपरी-चिंचवड हाउसिंग सोसायटी फेडरेशन पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. यावेळी माजी महापौर नितीन काळजे, माजी महापौर राहुल जाधव, सचिन तापकीर, फेडरेशनचे सचिव प्रकाश जुकंटवार, संघटक संजय गोरड, अमोल बांगर, सोसायटींचे चेअरमन- प्रतिनिधी आदी उपस्थित होते. त्या बैठकीमध्ये हाउसिंग फेडरेशनने मुदतवाढ देण्याची घेतलेली भूमिका तत्वत: मान्य केली होती. नागरी घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी अधिनियम २०१६ अन्वये प्रतिदिन १०० किलो कचरा निर्माण करणाऱ्या गृहसंस्था अथवा इतर आस्थापना यांनी त्यांच्या आस्थापनेत निर्माण होणाऱ्या ओला कचरा (जैव विघटनशील) कचऱ्याची विल्हेवाट दि. २ ऑक्टोबर २०२२ पर्यंत त्यांच्याच आवारात कंपोस्टिंग, बायोमिथनायझेशन अथवा अन्य तंत्रज्ञानाद्वरे लावणे बंधनकाकर केलेले आहे. याचे उल्लंघन केल्यास पहिला प्रसंग ५ हजार रुपये आणि त्यानंतर प्रत्येक वेळी १५ हजार रुपये दंड आकारण्यात येईल, असा निर्णय महापालिका आरोग्य विभागाने घेतला होता.

**"पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या प्रशासनाने सोसायटी फेडरेशनला विश्वासात न घेता जो निर्णय घेतला होता. त्याला स्थगिती देवून जी मुदतवाढ दिली आहे. महापालिका आयुक्त व प्रशासक शेखर सिंह व भोसरी विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश लांडगे यांनी मध्यस्थी करुन या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी मदत केली. त्यामुळे शहरातील सोसायटीधारक नागरिकांना दिलासा मिळाला आहे. परंतु, शहरातील सोसायट्यांच्या अडचणी व बांधकाम व्यावसायिकांच्या चुका समजून घेवून यावर कायमस्वरुपी तोडगा काढावा. यासाठी महापालिका प्रशासन, लोकप्रतिनिधी बांधील आहेत.**

– **संजीवन सांगळे,** अध्यक्ष, चिखली-मोशी-पिंपरी-चिंचवड हाउसिंग सोसायटी फेडरेशन.

**"शहरातील विविध संघटना, हाउसिंग सोसायटी फेडरेशन, गृहनिर्माण संस्था यांचे प्रतिनिधी यांनी निवेदनाद्वारे आणि समक्ष भेटून ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करणेकामी पुरेसा अवधी नसल्याने त्याच्या अंमलबजावणी कामी मुदत मागितली आहे. या करिता आयुक्तांनी दिलेल्या निर्देशानुसार सदर आस्थापनांना त्यांच्याच परिसरात कंम्पोस्टिंग करणे व ओल्या कचऱ्याची विल्हेवाट लावणेकरीता उपाययोजना करणेकामी ३१ ऑक्टोबर २०२२ पर्यंत अंतिम मुदत देण्यात आली आहे.**

– **अजय चारठाणकर,** उपायुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका.

## शॉर्ट न्यूज

### चांदणी चौक पूल पाडण्यासाठी प्रशासनाकडून जय्यत तयारी



।पुणे। महाईन्यूज ।

चांदणी चौक येथील पूल पाडण्यासाठी प्रशासनाकडून जय्यत तयारी करण्यात आली आहे. १ हजार ३५० डिटोनेटरच्या सहाय्याने नियंत्रित स्फोटाद्वारे रात्री एक ते दोन या वेळेत पूल पाडला जाणार आहे. तसेच पूल पाडण्यासाठी आणि मार्ग मोकळा करण्यासाठी १६ एक्स्कॅव्हेटर, चार डोझर, चार जेसीबी, ३० टिप्पर, दोन ड्रिलींग मशीन, २ अग्निशमन वाहन, ३ रुग्णवाहिका, २ पाण्याचे टँकर आणि पूल पाडण्यापासून रस्ता मोकळा करेपर्यंत साधारण २१० कर्मचारी एनएचएआयतर्फे नियुक्त करण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी डॉ.राजेश देशमुख आणि पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त अंकुश शिंदे यांनी चांदणी चौक परिसराला भेट देऊन पूल पाडण्याच्या कामाच्या अंतिम तयारीबाबत माहिती घेतली. पुण्याचे अतिरिक्त पोलीस आयुक्त संजय शिंदे, वाहतूक पोलीस उपायुक्त राहुल श्रीरामे, एनएचएआयचे प्रकल्प संचालक संजय कदम, संबंधित यंत्रणेचे अधिकारी आदी उपस्थित होते.

# खेड कॉंग्रेसचा शेवटचा बुरूजही ढासळला!

## आक्रमक अमोल पवारांचा शिवसेनेत प्रवेश



।पुणे (आंबेठाण)। महाईन्यूज।

एकेकाळी आमदारपदापासून सर्व सत्तास्थानांवर वर्चस्व गाजवलेल्या कॉंग्रेस पक्षाचे अस्तित्व शोधण्याची वेळ खेड तालुक्यात आली आहे. पक्षाचा एकमेव आक्रमक चेहरा असलेले आणि कॉंग्रेसचे खेड पंचायत समितीचे सदस्य अमोल पवार यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत शिवबंधन हाती बांधले आहे. पवार यांच्या शिवसेना प्रवेशामुळे कॉंग्रेसचा अखेरचा चिराही ढासळला आहे.

अमोल पवार हे पंचायत समितीच्या मागील पंचवार्षिक निवडणूक हे कॉंग्रेस पक्षाच्या चिन्हावर निवडून आले होते. त्यांनी पंचायत समितीचे उपसभापती म्हणूनही काम पाहिले आहे. मात्र, त्यांच्या शिवसेना प्रवेशामुळे खेड तालुक्यातील कॉंग्रेस नामशेष होण्याच्या मार्गावर येऊन ठेपली आहे. बंडानंतर खेड शिवसेनेला एक आक्रमक चेहरा मिळाल्याने शिवसेनेत काहीसे उत्साहाचे वातावरण आहे. खुद्द उद्धव ठाकरे यांनी या वेळी बोलताना 'अमोल पवार यांच्या रूपाने एक तगडा गडी शिवसेनेला मिळाला आहे, अशी भावना व्यक्त केली आहे.

## राष्ट्रवादीला धक्का; आमदार बेनकेंच्या निष्ठावंताचा शिवसेनेत प्रवेश!

माजी आमदार (स्व.) नारायणराव पवार यांच्या विचाराने अमोल पवार यांनी आजपर्यंत खेड तालुक्यात राजकारण केले आहे. आगामी २०२४ च्या निवडणुकीत खेड विधानसभेवर भगवा फडकावणार असल्याचेही पवार यांनी शिवसेनेतील प्रवेशानंतर सांगितले. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पवार यांचे पक्षात स्वागत केले. या वेळी माजी मंत्री सुभाष देसाई, खासदार अरविंद सावंत, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, सचिन अहीर, रवींद्र मिर्लेकर आदी उपस्थित होते.

## तालुक्यातील अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते शिवसेनेत प्रवेश करणार

दरम्यान, माजी उपसभापती अमोल पवार यांच्यासोबतच खेड खरेदी-विक्री संघाचे संचालक चेतनराव बोत्रे, भाजप युवा मोर्चाचे माजी अध्यक्ष राहुल येवले, कुरकुंडीचे माजी सरपंच सचिन भोकसे, माजी सरपंच अर्जुन गोगावले, सयाजी कोळेकर, खेड तालुका कॉंग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष संतोष भसे, विनोद येवले, अभय बळवंतराव डांगले, रोहिदास मुंगसे, गणेश भसे, संदीप चव्हाण आदींनी शिवसेनेत प्रवेश केला आहे. इतर पक्षांचेही तालुक्यातील अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते शिवसेनेत प्रवेश करणार असल्याचे पवार यांनी या वेळी स्पष्ट केले.

# अशोक नागरी सहकारी बँकेची २३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

## सभेस विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती

। पिंपरी । महाईन्यूज ।

**संत तुकारामनगर येथील अशोक नागरी सहकारी बँकेची २३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा गुरुवार दिनांक २९ सप्टेंबर रोजी सकाळी ११.०० वाजता खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. सभेच्या प्रारूप प्रसंगी सर्व महापुरुषांना व बँकेचे संस्थापक स्मृतिशेष डॉ. अशोक शिलवंत यांना पुष्पमाला अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रम प्रसंगी जेष्ठ विचारवंत आदरणीय आचार्य रतनलाल सोनाग्रा हे उपस्थित होते.**

> **आपल्या सर्वांच्या सहकार्याने आपण गेले २३ वर्षे बँकेचे कामकाज सुरळीत पार पाडत असल्याचे सांगितले तसेच रिझर्व्ह बँकेच्या नवीन धोरणाप्रमाणे आपण आज तागायत सतत १०% लाभांश वाटप केला आहे. पुढेही लाभांश वाटपात सातत्य राखू.**
> **- ॲड राजरत्न शिलवंत,** अध्यक्ष, अशोक नागरी सहकारी बँक.

त्यांनी उपस्थित सर्व संचालक व सभासदांना शुभेच्छा दिल्या. डॉ. अशोक शिलवंत यांनी सुरु केलेल्या कार्याला राजरत्न शिलवंत व सुलक्षणा शिलवंत हे चांगल्या प्रकारे सांभाळत आहेत त्याबद्दल त्यांचे उपस्थितांनी आभार मानले.

सदर कार्यक्रम प्रसंगी बँकेचे उपाध्यक्ष प्रकाश बालवडकर हे उपस्थित होते. तसेच, संचालक कल्पना शिलवंत, भीमराव माने, राकेश बर्डे, कायदे सल्लागार संदीप घाटे, शिलरत्न शिलवंत, सल्लागार रमेश राजाणी आदी मान्यवर उपस्थित होते. बँकेचे अध्यक्ष ॲड राजरत्न शिलवंत यांनी सभेला उपस्थित सर्व सभासद व संचालक मंडळाचे अभिनंदन केले. यावेळी उपस्थितांना संबोधित करताना बँकेचे अध्यक्ष ॲड राजरत्न शिलवंत यांनी बँकेच्या नव-नवीन योजनांची माहिती दिली. तसेच सभेस उपस्थित सर्व सभासदांना बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सर्व कामकाजाची माहिती दिली.



सभेसाठी डॉ. अमोल होलकुंडे, कारभारी टिळेकर, रामकिसन राठोड, माधव अडसुळे, प्रभाकर कोळी, अंकुश गायकवाड, प्रेमचंद उबाळे, सुभाष चवळे, हरिदास बनकर, हरिभाऊ सरदार, राजेंद्र भोसले, प्रकाश लोया, राजाभाऊ गोलांडे, सोना प्रधान, राकेश अगरवाल, शिल्पकार सुरेश राऊत, रोषण राम, विशाल कांबळे, जावेद शेख, हंसराज पालवे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

प्रास्ताविक ॲड राजरत्न शिलवंत यांनी केले, आभार बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौ.सुलक्षणा शिलवंत-धर यांनी मानले व सूत्रसंचालन मा. प्राध्यापक दिलीप कांबळे यांनी केले.

## आरक्षण हस्तांतरणास जिल्हाधिकारी राजेश देशमुख यांची अखेर मंजुरी

# मोशीत साकारणार पिंपरी-चिंचवडमधील सर्वांत मोठे हॉस्पिटल!

## हॉस्पिटलसह पॅरामेडिकल कॉलेज उभारण्यासाठी प्रशासनाचे नियोजन

**पिंपरी-चिंचवड ।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत समाविष्ट झाल्यानंतर सुमारे २० वर्षे पायाभूत सुविधांपासून वंचित असलेल्या पिंपरी-चिंचवडसह समाविष्ट गावांतील सर्वात मोठे अर्थात ८५० खाटांचे रुग्णालय उभारण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे. मोशी येथील गायरान जमीनीवर प्रस्तावित हॉस्पिटल होणार असून, संबंधित जागेचा ताबा महापालिका प्रशासनाला देण्यास जिल्हा प्रशासनाने मंजुरी दिली आहे.**



"भोसरी व्हीजन- २०२०" या महत्त्वाकांक्षी अभियानांतर्गत समाविष्ट गावांमध्ये पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी २०१७ पासून आमदार महेश लांडगे यांनी पुढाकार घेतला. गाव तिथे रुग्णालय या संकल्पनेतून राज्य शासन आणि महापालिका प्रशासन यांच्या एकत्रित प्रयत्नातून आरोग्य सुविधा उपलब्ध करण्यात येत आहेत. त्यासाठी चिखली, मोशी, चऱ्होली येथील मोकळ्या जागा प्रशासनाला सूचवल्या होत्या. यासह भोसरी विधानसभा मतदार संघातील जिल्हा प्रशासनाशी संबंधित प्रलंबित प्रश्नांबाबत दि. १२ सप्टेंबर २०२२ रोजी जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांच्या उपस्थितीत विविध विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत आमदार लांडगे यांनी बैठक घेतली होती.

यावेळी चिखली, मोशी, चऱ्होली या भागात जागा निश्चित करुन मोठे हॉस्पिटल उभारण्यासाठी जागेची निश्चित करावी. तसेच, यशवंतराव चव्हाण रुग्णालयावरील ताण कमी व्हावा. याकरिता समाविष्ट गावांमध्ये अत्याधुनिक सुविधा असलेले रुग्णालय महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून उभारावे, असा संकल्प होता. त्यासाठी चिखली, मोशी, चऱ्होली या गावांतील जागा जागा उपलब्ध करुन द्यावी, अशी मागणी आमदार लांडगे यांनी केली होती.

दरम्यान, अवघ्या ७ दिवसांत प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद देत मोशी येथील प्रस्तावित जागेचा रुग्णालयाच्या उभारणीसाठी ताबा देण्यासाठी मंजुरी दिली आहे. यापूर्वी, चिखली येथील जागा रुग्णालयासाठी प्रस्तावित होती. मात्र, सदर जागा वनविभागाच्या अंतर्गत येत असल्याने जागेचा प्रश्न निर्माण झाला होता. त्यानंतर मोशी येथील जागा निश्चित करण्यात आली. त्याला जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी हिरवा कंदिल दाखवला आहे. त्यामुळे चिखलीजवळ आणि मोशीत ८५० बेडचे हॉस्पिटल उभारणीचा मार्ग मोकळा झाला. मौजे मोशी, ता. हवेली येथील ग. नं. ६४६ पै. मधील आरक्षण क्रमांक १/१८९ मनपा उपयोग (हॉस्पिटल) जागा पिंपरी-चिंचवड महापालिकेस मनपा उपयोग या प्रयोजनार्थ आगाऊ ताबा देण्यास जिल्हा प्रशासनाने मंजुरी दिली आहे. याबाबत पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने हॉस्पिटल या प्रयोजनासाठी जमीन हस्तांतरण करण्याबाबत मागणी केली होती.

### वायसीएम हॉस्पिटलवरील ताण कमी होणार...

पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत १९९७ मध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या गावांमध्ये मोठ्या प्रमाणात नागरीकरण झाले आहे. चिखली, मोशी, चऱ्होली असा 'रेसिडेन्सिअल कॉरिडॉर' विकसित होत आहे. तसेच, पुणे जिल्ह्यातील खेड, चाकण, जुन्नर, आंबेगाव या भागातून वायसीएम रुग्णालयात रुग्ण उपचारासाठी येतात. पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या सध्यस्थितीला २८ लाखांच्या घरात आहे. त्यामुळे महापालिकेच्या माध्यमातून चालवले जाणारे वायसीएम हॉस्पिटलवर ताण येतो. पार्किंग आणि वाहतुकीचीही समस्या आहे. आता मोशीत उभारण्यात येणाऱ्या ८५० बेडच्या हॉस्पिटलमुळे वायसीएम रुग्णालयावरील ताण कमी होणार असून, समाविष्ट गावांसह महापालिका हद्दीलगतच्या ग्रामीण भागातील रुग्णांना सुविधा उपलब्ध होवून दिलासा मिळणार आहे.

### पॅरामेडिकल कॉलेजच्या दृष्टीने नियोजन...

मोशी येथील प्रशस्त जागेत तब्बल ८५० बेडचे अत्याधुनिक सुविधा असलेले रुग्णालय उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पुरेशी जागा उपलब्ध असल्यामुळे या ठिकाणी पिंपरी-चिंचवड मेडिकल कॉलेज, पॅरामेडिकल कोर्सेस कॉलेज, नर्सिंग कॉलेज उभारण्याबाबत महापालिका प्रशासन सकारात्मक असून, त्यादृष्टीने पायाभूत सुविधा निर्माण करण्यात येत आहेत. शहरासह उपनगर आणि ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांना चांगल्या आरोग्य सुविधा देण्याबाबत आमदार महेश लांडगे यांच्या माध्यमातून पाठपुरावा करण्यात येत आहे.

## "सिटीझन फीडबॅक" नोंदणीत पिंपरी चिंचवड

# शहराचा प्रथम क्रमांकाने गौरव!

## दिल्ली येथे केंद्रीय नगरविकास मंत्री कौशल किशोर यांच्या हस्ते आयुक्त शेखर सिंह यांनी स्वीकारला पुरस्कार

**पिंपरी।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**



केंद्र सरकारच्या स्वच्छ सर्वेक्षणांतर्गत शहरामध्ये पाहणी करण्यात आली होती. त्यामध्ये नागरिकांचा सहभाग अर्थात फिडबॅक ऑनलाइन पद्धतीने दिला जात होता. त्यामध्ये पिंपरी-चिंचवड शहराचा प्रथम क्रमांक आला आहे. 'सर्वोत्तम नागरिक अभिप्राय' यामध्ये शहराला देशात प्रथम क्रमांकाने गौरविण्यात आले.

दिल्ली येथे शनिवारी (दि. १) 'स्वच्छ अमृत पुरस्कार' सोहळा पार पडला. केंद्रीय नगरविकास मंत्री कौशल किशोर, केंद्रीय नगरविकास सचिव मनोज जोशी यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी उपायुक्त अजय चारठणकर, रविकिरण घोडके, आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे, सल्लागार प्रतिनिधी विनायक पद्मने, आरोग्य कर्मचारी व गोकुळ भालेराव आदी उपस्थित होते.

केंद्र सरकारच्या स्वच्छ सर्वेक्षणांतर्गत देश पातळीवर शहरांच्या स्वच्छतेबाबतचे परीक्षण करण्यात आले. त्यासाठी एप्रिलअखेरपर्यंत वेगवेगळी तीन पथके शहरात होती. नागरिकांचा सहभाग अर्थात फिडबॅक ऑनलाइन पद्धतीने घेण्यात आला. त्यासाठी दिलेली लिंक ओपन करून त्यात विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे द्यायची होती. त्यामध्ये सर्वाधिक नागरिकांनी फिडबॅक नोंदवला आहे. तसेच योग्य उत्तरे दिल्याने शहराला देशामध्ये प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे. दरम्यान यापूर्वी स्वच्छ सर्वेक्षणाच्या निकालामध्ये पिंपरी चिंचवड शहराने देशामध्ये १९ वा तर राज्यामध्ये चौथा क्रमांक मिळवला आहे.

# बेदाण्याला यंदा विक्रमी भाव...

## सणांमुळे मागणीत वाढ; दिवाळीपर्यंत दर चढेच

**पिंपरी।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**



तासगावच्या बेदाणा बाजारात दर्जेदार बेदाण्याच्या दरात दहा ते पंधरा रुपये वाढ झाली असून, दर्जेदार बेदाण्याला प्रति किलो २०० ते २२५, तर मध्यम प्रतीच्या बेदाण्याला १५० ते २०० रुपयांपर्यंत दर मिळतो आहे.

पुणे : गणेशोत्सव, नवरात्रासाठी बेदाण्याला मागणी वाढली होती. ही मागणी दिवाळीमुळे कायम आहे. तासगावच्या बेदाणा बाजारात दर्जेदार बेदाण्याच्या दरात दहा ते पंधरा रुपये वाढ झाली असून, दर्जेदार बेदाण्याला प्रति किलो २०० ते २२५, तर मध्यम प्रतीच्या बेदाण्याला १५० ते २०० रुपयांपर्यंत दर मिळतो आहे. दिवाळीपर्यंत स्थानिक बाजारातील तेजी कायम राहण्याची शक्यता व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

व्यापारी शक्यतो नवरात्र आणि दिवाळीसाठी एकाच वेळी बेदाणा खरेदी करतात. व्यापाऱ्यांनी यंदाची खरेदी ऑगस्ट महिन्यातच पूर्ण केली आहे. तरीही राज्यातून आणि राज्याबाहेरूनही मागणी कायम असल्यामुळे मागणी टिकून आहे. त्यामुळे तासगावच्या बेदाणा बाजारात शेतकऱ्यांना दर्जेदार एक नंबरच्या बेदाण्याला २०० ते २५० रुपयांपर्यंत दर मिळतो आहे. पंधरा ऑक्टोबपर्यंत बेदाणा सौदे सुरू राहण्याची शक्यता असून, तोपर्यंत दरातील तेजीही टिकून राहील, अशी माहिती सांगली-तासगाव बेदाणा र्मचट असोसिएशनचे अध्यक्ष राजेंद्र कुंभार यांनी दिली. यंदाच्या हंगामात अवकाळीसह अन्य अडचणी येऊनही राज्यात सुमारे १ लाख ६० हजार टन बेदाण्याचे उत्पादन झाले होते. नवा बेदाणा एप्रिल-मे महिन्यात बाजारात आल्यापासूनच दर दबावाखाली होते. त्यामुळे शेतकऱ्यांनी बेदाणा शीतगृहात साठवून ठेवण्याला प्राधान्य दिले होते.

## संपादकीय

# स्त्री स्वातंत्र्याचे पाऊल पुढचे...

***गेले काही महिने न्यायव्यवस्था सातत्याने महिलांचे हक्क उचलून धरणारे, त्यांचे समाजातील पुरुषांच्या बरोबरीचे स्थान अधोरेखित करणारे आणि देशातील व्यवस्था तसेच यंत्रणांनी महिलांच्या बाजूने उभे राहायला हवे, याचे सूचन करणारे निकाल देत आहे.***

न्यायालयांची ही सक्रियता स्वागतार्ह आहे. न्यायालयांचे निकाल आले म्हणजे, समाजात लगेच सगळे आलबेल होते, असे नाही. तसे असते तर सामाजिक चळवळींना शतकानुशतके 'दगडावरची पेरणी' करीत राहावे लागले नसते. मात्र, कोणत्याही लोकशाही समाजात न्यायप्रणाली कसे वागते, तिचा झुकाव कोणत्या बाजूला आहे, याला नितांत महत्त्व असते.

सर्वोच्च न्यायालयाने ताज्या निकालाने महिलांच्या गर्भपाताच्या आणि त्याच सोबत मातृत्वाच्या अधिकारांचा विस्तार केला आहे. एखादी महिला अविवाहित आहे, एवढ्या एकाच कारणाने तिला गर्भपाताचा अधिकार नाकारता येणार नाही, असा निकाल डॉ. न्या. धनंजय चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने जुलैत दिला होता. त्यानंतर, दोनच आठवड्यांत मद्रास उच्च न्यायालयाने १३ वर्षांची मुलगी २८ आठवड्यांची गर्भवती असताना नेहेमीचे निकष बाजूला ठेवून तिला गर्भपाताची अनुमती दिली होती. तिचे शारीरिक व मानसिक आरोग्य इतर कोणत्याही बाबींपेक्षा मोलाचे आहे, असे न्यायालयाने तेव्हा म्हटले होते. दिल्ली उच्च न्यायालयाचा एक निकाल अधिक स्पष्ट करतानाही सर्वोच्च न्यायालयाने अलीकडेच 'स्त्रीच्या देहावर केवळ तिचाच अंतिम अधिकार' हे तत्त्व निकालात नि:संदिग्ध शब्दांत नोंदवले होते. कायद्यातील कलमे व तरतुदींचा न्यायमूर्तींनी योग्य त्या परिप्रेक्ष्यात अन्वय लावायला हवा, ही सर्वोच्च न्यायालयाची अपेक्षा चूक नाही. ती त्याच्या अपेक्षा ताज्या निकालात पुरी झाली आहे. या खंडपीठाने 'महिलांचा लैंगिक अधिकार केवळ मूल होऊ देण्यापुरता मर्यादित नाही. आपल्या लैंगिक आरोग्याचाही निर्णय महिलेच्याच हाती हवा,' असे म्हटले आहे.

महिलांविषयक देशात जे कायदे आहेत, त्यात अनेकदा महिला कुमारिका आहे, विवाहिता आहे की विधवा आहे, या बाबीला अवास्तव महत्त्व येते. मालमत्ता, वारसाहक्क किंवा आर्थिक लाभांच्या कायद्यांमध्ये ती बाब महत्त्वाची असते. मात्र, कोणत्याही महिलेच्या शारीर अवस्थेबाबत किंवा तिच्या लैंगिक वर्तनाबाबत किंवा गर्भपाताच्या स्वातंत्र्याबाबत तिचे एकटे असणे किंवा विवाहित असणे, या बाबीचा काहीही संबंध नाही, हे अलीकडे न्यायालयांना वारंवार ठासून सांगावे लागले आहे. न्या. चंद्रचूड महिलांच्या या हक्कांबाबत सातत्याने पुरोगामी आणि कालोचित भूमिका घेत आहेत. विवाहित महिलांना तर अनेकदा गर्भधारणा व अपत्यप्राप्तीची सक्ती होते. यावेळी, त्यांच्या शरीरावर असणारा त्यांचा हक्क कुणाच्याही लक्षात नसतो.



## आनंदी सकाळ

# क्षुत्पिपासामलां ज्येष्ठामलक्ष्मीं नाशयाम्यहम्'

'वैदिक अर्थशास्त्रीय धारणेनुसार, श्रीसूक्तात अलक्ष्मीचाही उल्लेख आहे. 'क्षुत्पिपासामलां ज्येष्ठामलक्ष्मीं नाशयाम्यहम्' अशी ऋषींची प्रतिज्ञा आहे. 'अलक्ष्मी' ज्येष्ठ आहे. म्हणजे देहबुद्धी धारण केलेला माणूस आकर्षित होतो तो 'लक्ष्मीकडे'नव्हे तर 'अलक्ष्मी'कडे! पहिले प्राधान्य अलक्ष्मीला या अर्थाने ती ज्येष्ठ! ती 'क्षुत्पिपासामलाम्' म्हणजे क्षुधा, तृष्णा यांनी मलीन असलेली. आज जो वाममार्गाचा अवलंब करून नाना प्रकारांनी धन घरी आणतो, ती वैदिक ऋषींच्या धारणेनुसार 'अलक्ष्मी'आहे. क्षुधा, तृष्णा मरेपर्यंत संपतच नाही. पैशासाठी माय-बापांना, आप्तेष्टांना दूर ठेवणे, खून, अवैध, अनैतिक, भ्रष्टाचारी मार्गाने केलेले अर्थाजन म्हणजे 'अलक्ष्मी'. लक्ष्मी चंचल आहे, असे म्हणतात. वैदिक ऋषी सांगतात, लक्ष्मी नव्हे; 'अलक्ष्मी' चंचल आहे. तिला घरात आणाल तर जीवनाचे मातेरे होईल!



## भूमिका

# सुषमा स्वराज यांचा रुद्र अवतार



मागे सुषमा स्वराज यांनी भर लोकसभेत रुपयाचे अवमूल्यन होत असल्याबद्दल तत्कालीन युपीए सरकारला धारेवर धरले होते . समाज माध्यमांवर आजही ते भाषण उपलब्ध आहे त्या थेट पंतप्रधानांवर आसूड ओढताना म्हणाल्या होत्या "काल सेंसेक्स खाली आल्यावर रूपया इतका घरंगळत खाली आला की ६७ रुपयापासून तो रात्री ६८. ८९ वर येऊन उभा झाला. काल तर टीव्ही लावायला भिती वाटत होती कारण दर अर्ध्या तासाने १० पैसे, ५० पैसे, ६० पैसे खाली येत होते. मला दुख आहे कारण अर्थ मंत्र्यांनी यासाठी दिलेल्या कारणांमुळे मी असहमत आहे. अर्थव्यवस्था खाली जाण्यास सरकारची धोरणे कारणीभूत आहेत. सरकार आपल्या सहयोगी पक्षांसमवेत एकमतात नाहीए. अनेक बाबतीत विरोधी पक्षाने सहमती दिल्यावर सुध्दा कॅबिनेट मधील सहकाऱ्यांच्या विरोधामुळे करु शकत नाही. मला सांगतांना अतिशय दुख होतय की अधिकतर आरोप त्यांनी माजी अर्थमंत्र्यांवर लावले गुप्तपणे जे आज राष्ट्रपती आहेत. असच हे करत आले आहेत. महागाई साठी ते म्हणतील शरद पवार जबाबदार आहेत. जसा रूपया खाली येतो तशीच देशाची प्रतिष्ठा खाली येते. आज मी मागणी करते, अर्थमंत्री यांच्या विधानाचे जे हाल व्हायचे होते ते झाले परंतु आज आम्हाला पंतप्रधानांकडून यावर भाष्य हवय, इतके मोठे अर्थशास्त्री म्हणून नाव असलेले सगळ्यात मोठा विरोधाभास हा आहे अर्थशास्त्रातले पंडित असलेले मान्यवर आज देशाची अर्थव्यवस्था चालवू शकत नाहीत. म्हणून देशाचे नावाजलेले अर्थशास्त्री असलेल्या पंतप्रधानांकडून आम्हाला स्पष्टीकरण हवय. त्यांनी याव आणि सांगाव की रूपयाचे अवमूल्यन थांबेल की नाही आणि थांबणार असेल तर यावर काय उपाययोजना केली आहे. मी लोकसभा अध्यक्षांच्या माध्यमातून मागणी करते की पंतप्रधानांनी सभागृहात यावे आणि भाष्य करावे" आज त्यांचा हा रुद्रावतार आठवण्याचे कारण म्हणजे हाच आपला रुपया डॉलरच्या तुलनेत 82 वर घसरला तरी कोणीच काही बोलायला तयार नाही उलट भाजपच्या अर्थमंत्री निर्मलाताई म्हणतात आज भारताची आर्थिक परिस्थिती इतर देशांच्या तुलनेत चांगली आहे !! तरीही कोणीच काहीच बोलत नाही . भारतावरील कर्जाचा बोजा दिवसागणिक वाढतांना दिसत असल्याने अर्थतज्ज्ञांनी या विषयी अनेकदा चिंता व्यक्त केली आहे. डिसेंबर २०२१ तिमाहीत भारतावरील कर्जाचा आकडा हा १,२८,४१,९६ लाख कोटी होता. प्रत्येक तिमाहीत तो अधिकच वाढला असल्याची आकडेवारी समोर आली आहे. मार्च २०२२ तिमाहीत त्यात ३.७% वाढ झाली असून एकूण कर्जाची रक्कम १३३.२२ लाख कोटींच्या घरात आहे.

# निर्णय चांगला, पण अंमलबजावणी हवी

**प्रवाशांच्या सुरक्षेचा विचार करुन केंद्रीय रस्ते आणि वाहतूक मंत्रालयाने १ ऑक्टोबर २०२३ पासून चारचाकी आणि मोठ्या प्रवासी वाहनांमध्ये किमान ६ एअरबॅग्स अनिवार्य केल्या आहेत.**

एम-१ श्रेणीत येणाऱ्या चारचाकींसाठी हा नियम लागू असेल. ८ प्रवासी बसण्याची क्षमता असलेली आणि ३.५ टनापेक्षा कमी वजनाची सर्व वाहनं एम-१ च्या श्रेणीत येतात. मोटार वाहनांमधून प्रवास करणाऱ्या सर्व प्रवाशांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य असल्याचं म्हणत केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी नुकतीच याबाबतची घोषणा केली. केंद्र सरकारचा अतिशय स्तुत्य असा हा निर्णय म्हणावा लागेल. याआधी १ जानेवारी २०२२ पासून सर्व वाहनांमध्ये ड्युअल फ्रंट एअरबॅग म्हणजे वाहनचालक आणि त्याच्या शेजारी बसणाऱ्या व्यक्तीच्या पुढे एअरबॅग अनिवार्य करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यापुढचं हे पाऊल आहे. खरं तर देशात दर दिवशी होणाऱ्या वाहन अपघातांच्या संख्येकडे आणि मुख्यत्वेकरून या अपघातात बळी पडणाऱ्यांची संख्या पाहता हा निर्णय याआधीच व्हायला



पाहिजे होता. दुर्दैवाने त्यासाठी सायरस मिस्त्रींसारख्या उमद्या व्यक्तीमत्त्वाच्या उद्योजकाचा बळी जावा लागला.

तरीही देर आये दुरूस्त आये असंच या निर्णयाला म्हणावं लागेल. ६ एअरबॅग्स लावण्याची सोय करण्यासाठी वाहनांच्या डिझायनिंगमध्ये थोडाफार बदलही करावा लागेल. तसंच इतर आवश्यक उत्पादनांचीही मोठ्या संख्येने गरज भासेल, त्या अनुषंगाने हा नियम लागू करण्यासाठी वर्षभराचा अवधी वाहन उत्पादक कंपन्यांना देण्यात आला आहे. यामुळं आता वाहनांच्या किमतीदेखील वाढणार आहेत, परंतु जीवापेक्षा मोठं काहीच नाही, हेही तितकंच खरं. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार २०२० मध्ये देशात एकूण ३,६६,१३८ रस्ते अपघात झाले होते. या अपघातांमध्ये १,३१,७१४ जणांना आपला जीव गमवावा लागला. तर ३,४८,२७९ व्यक्ती या अपघातांमध्ये जखमी झाल्या. दुर्दैवाची बाब म्हणजे मृत्यूमुखी पडणाऱ्यांमध्ये १८ ते ४५ वयोगटातील व्यक्तीचींच संख्या अधिक आहे. यातील बहुतांश अपघात हे महार्गावर झाले असून अतिवेगामुळं वाहनावरील नियंत्रण सुटून अपघात होण्याचं प्रमाण सर्वाधिक आहे. पण केवळ एअरबॅग्ज असून भागणारी नाही, कारण त्यांचा उपयोग होण्यासाठी प्रवाशांने सिट बेल्ट लावण्याची गरज असते, पण त्याकडे लोकांकडून दुर्लक्ष केले जाते, ही उदासीनता आणि बेफिकिरी लोकांच्या जीवावर बेतते.

शहरी, निम्न शहरी आणि ग्रामीण भागात या वाढलेल्या क्रयशक्तीचा मध्यमवर्गीयांच्या जीवनशैलीवर मोठा परिणाम झाला. शहरीकरणाचा वेगाने विस्तार होत असताना वाहनांची संख्याही झपाट्यान वाढली.

## ।। अभंगवाणी ।।



बोलायाचा त्यासीं ।
नको संबंध मानसीं ॥१॥
जया घडली संतनिंदा ।
तुज विसरूनि गोविंदा ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### सरकारी कार्यालयात फोनवर बोलताना 'हॅलो'ऐवजी 'वंदे मातरम्' म्हणावं लागणार

।रत्नागिरी। महाईन्यूज ।

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त राज्यभरात फोनवर किंवा प्रत्यक्षात संवाद साधताना 'हॅलो'ऐवजी "वंदे मातरम्" अभियानाचा शुभारंभ होत आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या अभियानाचा शुभारंभ उद्या गांधीजयंतीच्या दिवशी वर्धा येथून होत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्यभरात हे अभियान यशस्वीपणे राबवण्याचा निर्धार संस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला आहे.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असताना स्वातंत्र्य लढ्यातील दिशादर्शक आणि क्रांतीचे निदर्शक असणाऱ्या या गीताच्या सुरुवातीच्या दोन शब्दांनी म्हणजेच "वंदे मातरम्" नी शासकीय कार्यालयातील अभिवादन फोनवरील संभाषणाच्या सुरुवातीस व्हावे, अशी जनसामान्यांची इच्छा होती. त्यास अनुसरून हा निर्णय घेण्यात आल्याचे मुनगंटीवार यांनी सांगितलं.सातारा जिल्ह्यातील वासोळे येथील एकाच

# एक तरफ बेईमान, एक तरफ निष्ठावान!

## अरविंद सावंतांची शिंदे गटावर आक्षेपार्ह टीका

।मुंबई । महाईन्यूज ।

**राज्यात सत्तांतर झाल्यापासून शिंदे गट आणि शिवसेनेमध्ये जोरदार संघर्ष सुरु असून, दसरा मेळाव्याच्या निमित्ताने दोन्ही गट जास्त आक्रमक झाले आहेत. शिंदे गट आणि शिवसेनेकडून दसरा मेळाव्यासाठी जय्यत तयारी सुरु आहे. एकनाथ शिंदे आणि उद्धव ठाकरे यांनी मेळाव्याचा टीझर प्रदर्शित केल्यापासून समर्थकांमधील उत्सुकता वाढली आहे. यादरम्यान दोन्ही गटाच्या नेत्यांकडून एकमेकांविरोधात आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झाडल्या जात आहेत. त्यातच शिवसेना खासदार अरविंद सावंत यांनी अप्रत्यक्षपणे शिंदे गटाला लक्ष्य करत एक ट्वीट केलं आहे.**



अरविंद सावंत यांनी ट्वीट करत शिंदे गटावर लाचार, बेईमान, कचरा अशी टिप्पणी केली आहे. यावेळी त्यांनी विकलेल्या निष्ठा माहिती नाही अशी टीका करताना आक्षेपार्ह उल्लेखही केला आहे.

**अरविंद सावंत यांचं ट्वीट –**
**एक तरफ लाचार**
**एक तरफ सदाचार,**
**एक तरफ बेईमान**
**एक तरफ निष्ठावान,**
**एक तरफ दसरा**
**एक तरफ कचरा,**
**बिके हुये क्या जाने निष्ठा**
**गुमराह कर रहे**
**खाकर विष्ठा !**

"गुलाबराव पाटलांनी ५० खोके घेतले मान्य आहे. पण चम्पासिंग थापाने काय केलं? ज्या थापाने त्याचं संपूर्ण आयुष्य बाळासाहेबांच्या चरणी अर्पण केलं होतं, तोदेखील यांना सोडून आला. टीका करायची तरी कशी," असं गुलाबराव पाटील म्हणाले आहेत.

एकनाथ शिंदे यांनी बंड पुकारल्यानंतरही मिलिंद नार्वेकर यांच्यासोबत मात्र त्यांचा संवाद कायम आहे. एकनाथ शिंदेंनी गणेशोत्सवात मिलिंद नार्वेकर यांच्या घरी जाऊन गणपतीचं दर्शन घेतलं होतं. एकनाथ शिंदे सूरतमध्ये असताना उद्धव ठाकरेंनी चर्चेसाठी ज्यांना पाठवलं होतं, त्यामध्ये मिलिंद नार्वेकरांचाही यांचा समावेश होता.

### दसरा मेळाव्यावरून शिवसेना, शिंदे गटात गर्दीचे दावे-प्रतिदावे

दसरा मेळाव्यासाठी शिवसेना आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून जोरदार तयारी करण्यात येत असून वांद्रे-कुर्ला संकुलातील शिंदे गटाच्या मेळाव्यासाठी एक लाख खुर्च्यांची व्यवस्था आहे, तर शिवसेनेच्या शिवाजी पार्कमधील मेळाव्यात ४० हजार खुर्च्या असतील, असा दावा शिंदे गटाकडून केला जात आहे. पोलिसांच्या अंदाजापेक्षा दुप्पट गर्दी होईल, असा दावा शिंदे गटाचे प्रवक्ते किरण पावस्कर यांनी केला, तर शिवाजी पार्क मैदान पूर्ण भरून बाहेरही कार्यकर्ते उभे असतील, असे शिवसेना नेते ॲड. अनिल परब यांनी स्पष्ट केले. यावरून गर्दी कोणत्या मेळाव्यात अधिक होणार यावरून दोन्ही बाजूने दावे-प्रतिदावे केले जात आहेत.

### ठाकरे यांच्यानंतर शिंदे यांचे भाषण?

दसरा मेळाव्यात ठाकरे आणि शिंदे यांच्यात भाषणांवरून कुरघोडी होण्याची चिन्हे आहेत. शिवाजी पार्क मैदानात शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या भाषणानंतरच मुख्यमंत्री शिंदे यांनी भाषण करावे, अशी शिंदे गटाची योजना आहे. म्हणजेच ठाकरे यांच्या टीकेला प्रत्युत्तर देता येईल. ठाकरे भाषण रात्री आठच्या सुमारास सुरू होते व नऊपर्यंत पूर्ण होते. रात्री ९ नंतर शिंदे यांनी भाषणाला सुरुवात करण्याची योजना आहे.

### मिलिंद नार्वेकर शिंदे गटात जाणार?

शिंदे गटातील आमदार गुलाबराव पाटील यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंचे विश्वासू आणि स्वीय सहाय्यक मिलिंद नार्वेकर शिंदे गटात येणार असल्याचा दावा केला आहे. त्यांच्या या विधानामुळे राजकीय वर्तुळात चांगलीच चर्चा रंगली आहे.

# प्रशासन नेमकं कोण चालवते हे देवालाच ज्ञात"

## सुप्रिया सुळेंची शिंदे-फडणवीस सरकारवर टीका

।मुंबई । ।महाईन्यूज ।

राज्यातील सरकार ओरबाडून सत्तेवर आले असून प्रचंड टीका झाल्यानंतर पालकमंत्री नियुक्त केले. काही मंत्री अद्याप आपल्या विभागातही गेलेले नाहीत. मंत्रालयात गेले तर मंत्री भेटत नाहीत. प्रशासन नेमकं कोण चालवते हे देवालाच ज्ञात अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेसच्या खा. सुप्रिया सुळे यांनी शनिवारी केली.

क्रांती अग्रणी जी.डी. बापू लाड जन्मशताब्दी निमित्त निराधार कुटुंबांना मदत आणि आशा सेविकांना सायकल वाटप आणि नाना-नानी पार्कचे उद्घाटन खा.सुळे यांच्या हस्ते कुंडल येथे आयोजित करण्यात आले होते. यावेळी अध्यक्षस्थानी आ. अरूण लाड होते. यावेळी आ. मानसिंगराव नाईक, आ.



क्रांती अग्रणी जी.डी. बापू लाड जन्मशताब्दी निमित्त निराधार कुटुंबांना मदत आणि आशा सेविकांना सायकल वाटप आणि नाना-नानी पार्कचे उद्घाटन खा.सुळे यांच्या हस्ते कुंडल येथे आयोजित करण्यात आले होते. यावेळी अध्यक्षस्थानी आ. अरूण लाड होते. यावेळी आ. मानसिंगराव नाईक, आ. सुमनताई पाटील, किरण लाड, शरद लाड आदींसह राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अविनाश पाटील, महिला जिल्हाध्यक्षा सुस्मिता जाधव आदी उपस्थित होते. कार्यक्रमानंतर खा. सुळे यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना खा. श्रीमती सुळे म्हणाल्या, शत्रुत्वाची भावना निर्माण करणारी नवीन संस्कृती भारतीय जनता लॉन्ड्री पक्षाने सुरू केली आहे.

सुमनताई पाटील, किरण लाड, शरद लाड आदींसह राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अविनाश पाटील, महिला जिल्हाध्यक्षा सुस्मिता जाधव आदी उपस्थित होते. कार्यक्रमानंतर खा. सुळे यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना खा. श्रीमती सुळे म्हणाल्या, शत्रुत्वाची भावना निर्माण करणारी नवीन संस्कृती भारतीय जनता लॉन्ड्री पक्षाने सुरू केली आहे. विरोधात बोलला तर तो शत्रू झाला अशा पध्दतीने काही मंडळी वागत आहेत. ही राज्याची संस्कृती नाही. खा. अमोल कोल्हे एका चित्रपटासंबंधी केंद्रिय गृहमंत्री अमित शहा यांना भेटले. यामध्ये गैर काहीच नाही. मतभेद असले तरी मनभेद असून नयेत ही महाराष्ट्राची संस्कृती आहे. राज्यातील सरकारबाबत बोलताना त्या म्हणाल्या, हे सरकार ओरबाडून आणलेले आहे. यातून चांगले काहीही निष्पन्न झालेले नाही. अनेक नेत्याकडून राज्याच्या संस्कृतीला न शोभणारी वक्तव्ये केली जात

# "भाजपाने दोन लोकांना रोजगार दिला "

## निलम गोऱ्हेंची सोमय्या, राणांवर टीका

।वाशीम । महाईन्यूज ।

शिवसेनेचा दसरा मेळावा आणि संघटना बांधणीसाठी विधानपरिषदेच्या उपसभापती निलम गोऱ्हे या बीड जिल्हा दौऱ्यावर आहे. यावेळी निलम गोऱ्हे यांनी भाजपावर निशाणा साधला आहे. भाजपाने दोन जणांना रोजगार मिळवून दिला आहे. तो म्हणजे किरीट सोमय्या आणि नवनीत राणा, अशा शब्दांत निलम गोऱ्हे यांनी सोमय्या आणि राणांचा समाचार घेतला आहे.

"महाविकास आघाडी सरकारच्या काळात जनतेच्या हितासाठी अनेक निर्णय घेण्यात आले. मात्र, राजकीय स्वार्थासाठी त्यांना स्थगिती देण्यात येत आहे. राज्यातील उद्योग-धंदे अन्य ठिकाणी जात आहेत, त्यावर लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे.



मात्र, यांचे वेगळेच उद्योग सुरु आहे," असा आरोप निलम गोऱ्हे यांनी शिंदे-फडणवीस सरकारवर केला. "पंकजा मुंडे लोकनेत्या आहेत"

पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे यांच्यातील वादावर निलम गोऱ्हे यांना विचारण्यात आलं. त्यावर त्यांनी स्पष्टपणे बोलण्यास नकार दिला. "पंकजा मुंडेंना मी बऱ्याच वर्षापासून ओळखते, त्या लोकनेत्या आहेत. त्यांचे काम देखील चांगलं त्या काय बोलल्या माहीत नाही. मात्र, त्यांची प्रगती व्हावी," अशा शुभेच्छा निलम गोऱ्हे यांनी दिल्या आहेत. त्या प्रसारमाध्यमांशी बोलत होत्या.

# काँग्रेसच्या अंतर्गत वादामध्ये भाजपाची उडी!

## 90 आमदारांचे राजीनामे प्रलंबित ठेवल्याचं म्हणत कोर्टात मागणार दाद?

**।राजस्थान ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

मागील काही दिवसांपासून राजस्थानमध्ये काँग्रेस आमदारांचं नाराजीनाट्य सुरू आहे. राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत काँग्रेस अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरणार होते. 'एक नेता, एक पद' यानुसार त्यांना राजस्थानच्या मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागणार होता. पण तत्पूर्वी काँग्रेसच्या आमदारांनी 'राजीनामास्त्र' उगारलं. गेहलोत समर्थक जवळपास ९० आमदारांनी विधानसभा अध्यक्षांकडे आपले राजीनामे सुपूर्द केले आहेत. मात्र, विधानसभा अध्यक्षांनी अद्याप राजीनामे मंजूर केला नाही. यावरून आता भारतीय जनता पार्टी न्यायालयात जाण्याच्या तयारीत आहे.

राजस्थान विधानसभेतील विरोधी पक्षनेते गुलाब चंद कटारिया यांनी शुक्रवारी 'इंडियन एक्स्प्रेस'शी संवाद साधला. काँग्रेसच्या ९० आमदारांचा राजीनामा प्रलंबित ठेवल्याबाबत न्यायालयात जायचं का? यावर आमचे नेते एकत्र येऊन चर्चा करतील. राजस्थान विधानसभेच्या नियमांनुसार, एखाद्या आमदाराचा राजीनामा मंजूर करण्यासाठी संबंधित आमदाराने राजीनामा देण्याची इच्छा व्यक्त करणंही पुरेसं आहे. पण संबंधित आमदारांचे राजीनामे अद्याप प्रलंबित असल्याचं कटारिया यांनी सांगितलं. खरं तर, 'राजीनामास्त्र' उगारणाऱ्या आमदारांशी कोणत्याही प्रकारे सल्लामसलत न करता काँग्रेस हायकमांडने राजस्थानच्या मुख्यमंत्री पदाबाबत 'एकतर्फी' निर्णय घेतला.



### राजीनामा देण्याबाबतचे नियम काय आहेत?

⏭ राजस्थान विधानसभेच्या कार्यपद्धतीच्या नियम १७३ (२) मध्ये असं म्हटलं आहे की, एखाद्या सदस्याने वैयक्तिकरित्या आपला राजीनामा विधानसभा अध्यक्षांकडे सुपूर्द केला आणि त्यांना सूचित केले की ते राजीनामा देऊ इच्छित आहे. अशावेळी विधानसभा अध्यक्ष ताबडतोब संबंधित राजीनामा स्वीकारू शकतात. तर नियम १७३ (३) नुसार, राजीनामा पोस्टाने किंवा इतर कोणत्याही व्यक्तीद्वारे पाठवला असेल तर, "राजीनामा ऐच्छिक आणि खरा आहे का? याची पडताळणी करण्यासाठी विधानसभा अध्यक्ष राजीनामा प्रलंबित ठेऊन चौकशी करू शकतात. तर नियम १७३ (४) मध्ये असं म्हटलं आहे की, विधानसभा अध्यक्षांनी राजीनामा स्वीकारण्यापूर्वी संबंधित सदस्य कधीही आपला राजीनामा मागे घेऊ शकतो. या प्रकरणी 'इंडियन एक्स्प्रेस'ने सीपी जोशी यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.

यामुळे संबंधित आमदार नाराज आहेत. सुमारे ९० आमदारांनी काँग्रेस विधीमंडळ पक्षाची बैठक धुडकावून २५ सप्टेंबर रोजी रात्री उशिरा राजस्थान विधानसभा अध्यक्ष सी पी जोशी यांच्याकडे आपले राजीनामे सुपुर्द केले आहेत. तेव्हापासून जोशी यांच्याकडेच राजीनामे प्रलंबित आहेत.

"एखाद्या आमदाराने विधानसभा अध्यक्षांकडे राजीनामा देण्याची इच्छा व्यक्त केली तर संबंधित आमदाराचा राजीनामा स्वीकारला जातो. राजीनामा पत्रात काही अटी असतील तर राजीनामा प्रलंबित ठेवण्याचं कारण समजू शकतो. पण त्यांच्या राजीनाम्यात कोणत्याही अटी नाहीत, शिवाय ते राजीनामा देण्यास इच्छुक आहेत. त्यामुळे त्यांचे राजीनामे स्वीकारण्यास पात्र आहेत," असंहीकटारिया म्हणाले.

# दुबईतून माघारी आणलेल्या निर्यात मालातून अडीच कोटींचे रक्तचंदन जप्त



**।काबूल ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

जेएनपीटी मधून दुबईतील जेबेल अली बंदरात निर्यात करण्यात आलेल्या संशयित कंटेनरमधून अडीच कोटींचे तीन मेट्रीक टन रक्तचंदन जेएनपीटी सीमा शुल्क विभागाच्या सीआययू ने जप्त केले आहे.जेएनपीटी बंदरातून दुबईत निर्यात करण्यात आलेल्या मालाच्या कंटेनर बाबत सीमा शुल्क विभागाला संशय होता. त्यामुळे केंद्रीय गुन्हे पथकाने हा कंटेनर परत मागविला होता. या दुबईतून परत मागविण्यात आलेल्या कंटेनर ची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये निर्यात करण्यात आलेला सुमारे ३ मेट्रिक टन रक्तचंदन आढळले आहे.

दोन आठवड्यापूर्वी उरण परिसरातील सीएफएस(गोदामातून) अशाच प्रकारे सुमारे ३ मेट्रिक टन रक्तचंदन जप्त करण्यात आले होते. या प्रकरणाचा तपास करीत असतांना समोर आलेल्या माहिती वरून सीमा शुल्क विभागाने हा निर्यात झालेला संशयित कंटेनर परत मागविला होता. या कंटेनर मध्ये हे तस्करी करण्यात आलेले रक्तचंदन जप्त करण्यात आले आहे.

जेएनपीटी बंदरातून दुबईत निर्यात करण्यात आलेल्या मालाच्या कंटेनर बाबत सीमा शुल्क विभागाला संशय होता. त्यामुळे केंद्रीय गुन्हे पथकाने हा कंटेनर परत मागविला होता. या दुबईतून परत मागविण्यात आलेल्या कंटेनर ची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये निर्यात करण्यात आलेला सुमारे ३ मेट्रिक टन रक्तचंदन आढळले आहे.

# "इतिहासात १ ऑक्टोबरची नोंद सुवर्ण अक्षरात होईल",

## 5G लॉंच कार्यक्रमात पंतप्रधान मोदींचे प्रतिपादन

**।नवी दिल्ली ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज नवी दिल्लीतील प्रगती मैदानावर आयोजित इंडिया मोबाइल काँग्रेसच्या सहाव्या सत्राचे उद्घाटन पार पडले. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील 5G सेवेचाही शुभारंभ केला. यावेळी संबोधित करताना त्यांनी 5G चे फायदे आणि ही सेवा भारतात कशा प्रकारे क्रांती घडवून आणेल, यावर भाष्य केले. तसेच आजच्या तारखीची नोंद इतिहासात सुवर्ण अक्षरांत होईल, असेही ते म्हणाले. "आम्ही सत्तेत आल्यानंतर देशात तंत्रज्ञानाच्या वापरावर भर दिला. आम्ही डिजीटल भारत ही संकल्पना सुरू केली. त्याचा परिणाम आज भारत तत्रज्ञानाच्या क्षेत्रात आत्मनिर्भर होतो आहे. आधी 2G, 3G आणि 4G साठी



भारत इतर देशांवर अवलंबून होता. मात्र, आता 5G तंत्रज्ञानाने भारताने दूरसंचार क्षेत्रात जागतिक मानकं स्थापित केली आहेत.", असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

"डिजिटल वापरावर भर देण्याबरोबच आपण उपकरणांच्या किंमती आणि डेटाच्या किंमतीवरही लक्ष केंद्रीत केले आहे. २०१४ पर्यंत आपण १०० टक्के मोबाईल आयात करत होतो. मात्र, आता देशात २०० मोबाईल युनिट निर्मिती केंद्र तयार करण्यात आले आहे. भारतात २०१४मध्ये २५ कोटी इंटरनेट युजर्स होते, हा आकडा आता ८५ कोटींवर पोहोचला आहे", अशी माहिती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली. तसेच आता 5G तंत्रज्ञान क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावेल, असेही ते म्हणाले.तत्पूर्वी, एअरटेल, जीओ सारख्या कंपन्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना 5G चे प्रात्याक्षिक दाखवले. यावेळी त्यांनी 'जिओ-ग्लास'सह इतर 5G उपकरणांची पाहणी केली. तसेच एंड-टू-एंडचे स्वदेशी तंत्रज्ञानही समजून घेतले

# आशा पारेख यांना दादासाहेब फाळके पुरस्कार प्रदान

## राष्ट्रपतींच्या हस्ते राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांचे वितरण

**।नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

ज्येष्ठ अभिनेत्या आशा पारेख यांना शुक्रवारी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याहस्ते दादासाहेब फाळके पुरस्कार प्रदान करण्यात आला.

पीटीआय, नवी दिल्ली : ज्येष्ठ अभिनेत्री आशा पारेख यांना दादासाहेब फाळके पुरस्काराने शुक्रवारी सन्मानित करण्यात आले. येथील विज्ञान भवनात झालेल्या ६८व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार वितरण सोहळय़ात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. यावेळी राष्ट्रपती म्हणाल्या की, "अधिक चांगला समाज आणि देश घडवण्यामध्ये चित्रपटांचे




योगदान मोठे असते. दृकश्राव्य माध्यम असल्यामुळे अन्य कोणत्याही माध्यमापेक्षा त्याचा प्रभाव अधिक असतो."

पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन करताना राष्ट्रपती मुर्मू म्हणाल्या की, "आशा पारेख यांचे चित्रपटसृष्टीत मोठे योगदान आहे. प्रेक्षकांकडून त्यांना भरभरून प्रेम मिळाले. त्यांचा सत्कार हा सर्व स्वतंत्र स्त्रीशक्तीचा सन्मान आहे." यावेळी अभिनेते अजय देवगण, दाक्षिणात्य अभिनेता सुरिया, त्याची पत्नी अभिनेत्री ज्योतिका, केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर आदी उपस्थित होते.

# 'नाळ'च्या प्रचंड यशानंतर येतोय 'नाळ २'

फॅन्ड्री, सैराट, नाळ, झुंड आदी दर्जेदार चित्रपटांच्या माध्यमातून समाजातील वंचितांचे प्रश्न समोर आणणारे त्यावर सडेतोडपणे भाष्य करणारे एक संवेदनशील दिग्दर्शक म्हणजे नागराज पोपटराव मंजुळे. नागराज यांनी चित्रपट विश्वात स्वतःचे नावच केले नाही तर एक इतिहास घडवला. अत्यंत बिकट परिस्थितीवर मात करून नागराज इथवर पोहोचले आहेत. काही दिवसांपूर्वीच त्यांचा 'झुंड' चित्रपट येऊन गेला. त्याला प्रेक्षकांनी प्रचंड प्रतिसाद दिला. आता नागराज यांनी एक पोस्ट शेअर करत त्यांच्या नव्या चित्रपटाची घोषणा केली आहे. नगराज मंजुळे यांचे दिग्दर्शन तर आपण अनेक चित्रपटांमधून पाहिले आहेच. पण त्यांच्या अभिनयाची झलक दिसली ते 'नाळ' या चित्रपटातून. अनेक पुरस्कार प्राप्त आणि प्रचंड यश मिळवलेल्या चित्रपट म्हणजे 'नाळ'. या चित्रपट नागराज मंजुळे आणि देविका दफ्तरदार प्रमुख भूमिकेत होते. तर नागराज यांनी या चित्रपटाची निर्मिती केली होती. या चित्रपटातून अत्यंत वेगळा विषय हाताळला गेला. आता याच चित्रपटाचा दुसरा भाग लवकरच आपल्या भेटीला येत आहे. नुकतीच याबाबत नागराज मंजुळे यांनी घोषणा केली. नागराज यांनी एक पोस्ट शेअर केली आहे. त्यामध्ये म्हणतात, 'मागच्या महिन्यात सुधाकरने Sudhakar Yakkanti अचानक फोन करून सांगितलं की नाळचा दुसरा भाग लिहिलाय. ऐकायला कधी भेटुयात ?..



# प्रिया बापटचा भन्नाट किस्सा

गेली काही दिवस सुबोध भावेच्या 'बस बाई बस' या कार्यक्रमाची भलतीच चर्चा आहे. झी मराठी वाहिनीवरील 'बस बाई बस' या नव्या मालिकेत महिला कलाकार, राजकारणी सहभागी होतात यावेळी त्यांना इतर महिलांच्या मनातले प्रश्न विचारले जात आहेत. अशी भन्नाट संकल्पना असणाऱ्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुबोध भावे (SUBODH BHAVE) करत आहे. या कार्यक्रमात आजवर अनेक दिग्गजांनी हजेरी लावली आहे. मराठीसह हिंदीलाही भुरळ घालणारी अभिनेत्री प्रिया बापट हिने नुकतीच या कार्यक्रमात हजेरी लावली. यावेळी तिने तिच्या नाटकाचा एक भन्नाट किस्सा सांगितला. हा किस्सा ऐकून तुम्हीही हसून वेडे व्हाल.. मालिका, चित्रपट, नाटक, वेब सिरिज अशा विविध माध्यमातून प्रेक्षकांना भुरळ घालणारी प्रिया नुकतीच बस बाई बस या शो मध्ये आली होती. यावेळी एका मजेशीर प्रश्नावर प्रियाने दिलेले उत्तर ऐकून एकाच हशा पिकला. प्रियाने बरीच वर्षे व्यावसायिक नाटकात काम केले आहे. त्याच नाटका दरम्यानचा हा किस्सा आहे. यावेळी सुबोध भावेने प्रियाला विचारले, 'कलाकार कधी वाक्य विसरतात, कधी जास्तीची वाक्य घेतात, यामुळे बऱ्याचदा नाटक लांबतं. अडीच तासाचं नाटक कधीकधी तीन तासाचं होतं.



# रश्मिका अजूनही गुंतलीय जुन्या नात्यात;

रश्मिका मंदाना दक्षिणेतील प्रसिद्ध अभिनेत्रींपैकी एक आहे. तिच्या सिनेमांपेक्षा अधिक नेहमीच तिच्या सौंदर्याची चर्चा रंगलेली दिसून येते. लोक तिच्या एका स्माईलवर जीव ओवाळून टाकताना दिसतात. सध्या रश्मिका आपल्या नव्या बॉलीवूडच्या सिनेमामुळे चर्चेत पहायला मिळतेय.



याच सिनेमाच्या प्रमोशन निमित्तानं गेली असताना रश्मिकानं काही पर्सनल गोष्टी देखील शेअर केल्या आहेत.

ती अजूनही आपल्या एक्स बॉयफ्रेंडला भेटते,त्यासाठी काही कारणच असावं असं नाही असं सांगतानाच आमच्यात अजूनही चांगलं नातं आहे असं म्हणून गेली रश्मिका. आणि बस्स चर्चेला उधाण आलं. याचवेळी रश्मिका म्हणाली,"प्रेमाचं नातं तुटल्यानंतरही आमच्यात मैत्रीचं नातं इतकं चांगलं टिकून राहिलंय यावर माझा अजूनही विश्वास बसत नाही".

रश्मिका लवकरच 'गूडबाय' या सिनेमातून बॉलीवूड इंडस्ट्रीत पदार्पण करतेय. रश्मिकाला या सिनेमाच्या प्रमोशन निमित्तानं दिलेल्या एका मुलाखतीत विचारलं गेलं की,'जर एखाद्या पार्टीत तुला तुझा जुना बॉयफ्रेंड भेटला तर तुझी रिॲक्शन काय असेल?' तेव्हा तिनं 'नमस्ते' असं उत्तर दिलं. पुढे ती म्हणाली,"माझ्या एक्ससोबत माझी अजूनही चांगली मैत्री आहे. मी त्याच्यासोबतच त्याच्या कुटुंबियांना भेटणंही पसंत करते". एवढ्यावरच रश्मिका थांबली नाही तर तिनं हे स्विकारलं की,"खरंतर त्याचं लग्न झाल्यानंतर मी त्याला भेटणं ही चांगली गोष्ट नाही पण आमच्यात मैत्रीचं खूप चांगलं नातं आहे, पण मग हे देखील चांगलंच आहे नाही का".




# यंदा शेवंताची जादू!

बहुचर्चित आणि बहुप्रतीक्षित अशा 'बिग बॉस मराठी' या लोकप्रिय कार्यक्रमाचे चौथे पर्व लवकरच सुरु होणार आहे. 2 ऑक्टोबर रोजी या कार्यक्रमाचा ग्रँड प्रीमियर होणार आहे. या कार्यक्रमात कोणते स्पर्धक असणार याची सर्वांनाच उत्सुकता लागली आहे. नुकतेच कलर्स मराठीने एक व्हिडिओ शेअर केला आहे. यामध्ये एक स्पर्धक नृत्य करताना दिसत आहे. विशेष म्हणजे ही स्पर्धक नेमकी कोण आहे यावरुन बरीच चर्चा सुरू आहे. काहींनी आपापले अंदाजही वर्तवले आहेत. तर बघूया ही स्पर्धक कोण आहे.

बिग बॉस मराठी 4 च्या ग्रँड प्रीमियरची झलक आता समोर येऊ लागली आहे. रोज एका स्पर्धकाचा प्रोमो वाहिनीकडून शेअर केला जात आहे. यामध्ये स्पर्धकाचा चेहरा दिसत नसला तरी प्रेक्षक मात्र तो चेहरा ओळखण्यात दंग झाले आहेत. काहींचे अंदाज अचूक असतील असेही दिसत आहे. असाच एक प्रोमो समोर आला आहे, एका प्रसिद्ध अभिनेत्रीचा चेहरा दिसत आहे. 'बिग बॉस च्या घरात थिरकली.. लोखो दिलाची धडकन' असा या व्हिडिओला व्हॉईस ओवर देण्यात आला आहे. शिवाय ही स्पर्धक गंगुबाई चित्रपटातील 'ढोलीडा' या गाण्यावर थिरकताना दिसत आहे. या प्रोमोने प्रेक्षकांची उत्सुकता चांगलीच ताणून धरली आहे. त्यामुळे बिग बॉसच्या घरात जाणारी ही अभिनेत्री नेमकी कोण आहे यावर तर्क वितर्क सुरू आहे.

पण यावर


# 'आदिपुरुष' मध्ये झळकणार तेजस्विनी पंडित..



आपल्या दर्जेदार अभिनयाने यशाची उंची गाठलेल्या अभिनेत्री तेजस्विनी पंडित हीने नुकतीच एक मोठी बातमी दिली आहे. तेजस्विनी कायमच चर्चेत असते. आजवर तिने अनेक मालिका आणि चित्रपट केले आहेत. काही दिवसांपूर्वी ती 'रानबाजार'या वेब सिरीजमुळे चर्चेत आली होती. यामध्ये तिच्या बोल्ड सिन वरुन बरीच टीका देखील टीका झाली. पण तिनेही सडेतोड उत्तर देत सर्वांचे तोंड बंद केले होते. आता पुन्हा एकदा ती चर्चेत आली आहे. त्याचे कारणही खास आहे. ती एका मोठ्या चित्रपटात झळकणार आहे. यासंदर्भात तिने एक पोस्ट केली आहे. ) अभिनेत्री तेजस्विनी पंडितने आपल्या सोशल मीडिया अकाऊंटवरून एक पोस्ट केली आहे. यामध्ये तिने 'आदिपुरुष' या बहुचर्चित चित्रपटाचं पोस्टर शेअर केलं आहे. तिने या पोस्टमध्ये म्हटलं आहे की, 'आरंभ.. 2 ऑक्टोबरला आमच्यासोबत चित्रपटाचा टीझर बघायला तयार राहा..' या पोस्टचा अर्थ असा की की तेजस्विनी या चित्रपटात महत्वाच्या भूमिकेत असणार आहे.

## शॉर्ट न्यूज »

### मीराबाई चानूचे आणखी एक सुवर्ण!



।हॅरिसन। महाईन्यूज

राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी भारतीय पोस्टर गर्ल मीराबाई चानूने सुवर्णपदक पटकावले. सध्या गुजरातमध्ये राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा २०२२ हंगाम खेळला जात आहेत. त्यात भारताच्या लेकींनी चमकदार कामगिरी केली आहे.

शुक्रवारी, ३० सप्टेंबर वेटलिफ्टिंग पासून ते हळू पळण्याच्या शर्यती (रेस वॉक) पर्यंत भारतीय महिलांनी जबरदस्त प्रदर्शन करत पदके जिंकली. नेमबाजीमध्ये काही अप्रतिम सामने पाहायला मिळाले. ऑलिम्पिक रौप्यपदक विजेती मीराबाई चानूने शुक्रवारी ३६व्या राष्ट्रीय क्रीडा २०२२ मध्ये सुवर्णपदक पटकावले. तिने महिलांच्या वेटलिफ्टिंग स्पर्धेत ४९ किलो वजनी गटात १९१ किलोचा भार उचलून ही किमया साधली.

# महिला आशियाई टी-20 चा बांगलादेशात आजपासून थरार!

भारत-पाकिस्तान ही बहुप्रतिक्षित लढत 7 ऑक्टोबरला होणार आहे.

।अहमदाबाद । महाईन्यूज ।



महिला आशियाई टी-२० करंडकाचा थरार उद्यापासून बांगलादेशमध्ये रंगणार आहे. बांगलादेशमधील सिल्हेट आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियममध्ये या स्पर्धेच्या लढती रंगणार असून सात देशांमध्ये अजिंक्यपदाची स्पर्धा असणार आहे. सर्वाधिक सहा वेळा या स्पर्धेचा विजेता ठरलेल्या भारतीय महिला संघासमोर उद्या होणाऱ्या सलामीच्या लढतीत श्रीलंकेचे आव्हान असणार आहे. भारत-पाकिस्तान ही बहुप्रतिक्षित लढत ७ ऑक्टोबरला होणार आहे. भारतीय संघाने आतापर्यंत झालेल्या आशियाई करंडकात घवघवीत यश संपादन केले आहे. आशियाई करंडक पहिल्या चार मोसमात एकदिवसीय प्रकारात खेळवण्यात आला. त्यानंतर अखेरच्या तीन मोसमात टी-२० प्रकारात ही प्रतिष्ठेची स्पर्धा खेळवण्यात आली. भारतीय संघाने पहिल्या चार आणि नंतर दोन अशा एकूण सहा वेळा या स्पर्धेच्या जेतेपदावर मोहोर उमटवली आहे भारतीय संघाला गेल्या काही आंतरराष्ट्रीय टी-२० लढतींमध्ये अपयशाला सामोरे जावे लागले आहे. इंग्लंडविरुद्धच्या टी-२० मालिकेतही त्यांचा पराभव झाला. मात्र त्यानंतर झालेल्या एकदिवसीय मालिकेत भारतीय महिला संघाने इंग्लंडला हरवण्याची करामत करून दाखवली. आता हाच फॉर्म कायम ठेवत आशियाई करंडक सातव्यांदा जिंकण्यासाठी हरमनप्रीत कौरचा भारतीय संघ प्रयत्न करताना दिसेल. कर्णधार हरमनप्रीत कौर व स्मृती मंधना यांच्या खांद्यावर भारतीय फलंदाजीची मदार असणार आहे. जेमिमा रॉड्रिग्सचे पुनरागमन होणार आहे. जेमिमासह शफाली वर्मा, एस. मेघना व दयालन हेमलता यांनाही आपली चुणूक दाखवावी लागणार आहे. तसेच रेणुका सिंग, राधा यादव, राजेश्वरी गायकवाड व दीप्ती शर्मा यांना गोलंदाजीत ठसा उमटवावा लागेल.हरमनप्रीत कौर हिने सलामीच्या लढतीच्या पूर्वसंध्येला आपले मत व्यक्त करताना म्हटले की, आशियाई करंडकामधून आम्ही पुढल्या वर्षी होत असलेल्या टी-२० विश्वकरंडकाची तयारी करणार आहोत. फलंदाजांना वेगवेगळ्या क्रमावर फलंदाजी करायला पाठवणार आहोत.

# जेमीमाह रोड्रिगेझची तुफानी खेळी!

## भारतीय महिला संघाचा श्रीलंकेवर 41 धावांनी विजय

।नवी दिल्ली। महाईन्यूज ।



बांगलादेश येथे सुरू असलेल्या महिला आशिया चषक २०२२चा दुसरा सामना भारत विरुद्ध श्रीलंका यांच्यात खेळला गेला. जेमीमाह रोड्रिगेझच्या अर्धशतकाच्या जोरावर भारतीय महिला संघाने श्रीलंकेवर ४१ धावांनी विजय मिळवत महिला आशिया चषकात विजयी सलामी दिली. श्रीलंका पूर्ण षटके देखील खेळू शकली नाही. सर्वबाद १०९ धावा केल्या. या सामन्यात भारताने जेमीमाह रोड्रिगेझ आणि हरमनप्रीत कौर यांच्या भागीदारीने दीडशतकी धावसंख्या उभारली आहे. जेमीमाहने महत्वाची खेळी केल्याने भारताने २० षटकात सहा गडी गमावत १५० धावा केल्या. तिलाच सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला.

श्रीलंकेने धावांचा पाठलाग करताना खराब सुरुवात केली. संघाची धावसंख्या २५ असतानाच कर्णधार चमारी अट्टापटू ही ५ धावा करून बाद झाली. त्यानंतर एका पाठोपाठ एक गडी बाद होत गेले. भारताची गोलंदाज हेमलताने सर्वाधिक ३ बळी घेतले. पूजा वस्त्रकार आणि दीप्ती शर्माने प्रत्येकी २-२ गडी बाद केले. राधा यादवने देखील एक गडी बाद करत भारताच्या गोलंदाजांना साथ दिली. श्रीलंकेकडून हसिनी परेरा हिने सर्वाधिक म्हणजेच ३२ चेंडूत ३० धावा केल्या. तत्पूर्वी, श्रीलंकेने नाणेफेक जिंकत भारताला प्रथम फलंदाजी करण्याचे आव्हान दिले. यावेळी सुरूवातीलाच भारताचा संघ अडखळला. शेफाली वर्मा आणि स्मृती मंधाना यांनी लवकरच आपल्या विकेट्स गमावल्या. दोघींनी अनुक्रमे १० आणि ६ धावा करत बाद झाल्या. सामन्यात भारताच्या डावाची ४ षटके पूर्ण झाली असता धावसंख्या २ गडी गमावत २३ एवढी होती.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही